REGISTERED No. B. 3434




# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २४ जुलै १९४६ अंक ३०

## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रेन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे) —एकमेव विक्रेते—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# बँक ऑफ पूना लि.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल ... | रु. २५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १२,५०,००० |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया, (अध्यक्ष)
शेठ डी. आर. नाईक, जे. पी. (उपाध्यक्ष)
डॉ. ना. भि. परुळेकर, M. A., Ph. D.
शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, (सोलापूर)
शेट फ्रामजी पी. पोचा
शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी

हेड ऑफिस—४५५ रविवार पेठ, पुणें.

शाखा—(१) ३६१ सदाशिव पेठ, पोस्टासमोर, (२) १२ भवानी पेठ, पुणें.

## सेफ डिपॉझिट लॉकरची अल्प भाड्यांत सोय

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.···उद्योग-धंद्यांना व व्यापारवाढीला सवलत.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यास लिहा.

गो. गं. साठे, ॲक्टिंग मॅनेजर.

## विविध माहिती

**स्ट्रॉबोर्ड व मिलबोर्ड**—स्ट्रॉबोर्ड व मिलबोर्ड यांच्या कारखानदाराशी विचारविनिमय करून दिनांक १ जुलै १९४६ पासून स्ट्रॉबोर्ड व मिलबोर्ड ह्यांच्या कमाल किंमती दर हंड्रडवेटास अनुक्रमें रु. १-८-० व रु. ३-८-० प्रमाणें कमी करण्याचें ठरविलें आहे. ह्याप्रमाणें १९४४ च्या कागद नियंत्रण हुकुमांत दुरुस्ती करण्यांत आली आहे. सर्व प्रकारचे स्ट्रॉबोर्ड व मिलबोर्ड ह्या तारखेपासून दुरुस्त केलेल्या किंमतीस च विकले पाहिजेत.

**इं. बँकेचें भांडवल वाढविणार ?**—इंपीरिअल बँकेचें भांडवल वाढविण्यांत येणार असल्याची बातमी आहे.

**रशियांत चहाची लागवड** रशियामध्यें चहाची लागवड पुष्कळच वाढली आहे. त्यामुळें हिंदुस्थानाच्या चहाची ती बाजारपेठ कमी होणार आहे.

**शेगांव येथें वनस्पति तुपाचा कारखाना**—वऱ्हाडांतील बुलढाणा जिल्ह्यामधील शेगांव येथें वनस्पति तुपाचा कारखाना सुधा इंडस्ट्रीज लि. ही कंपनी स्थापन करीत आहे. श्री. अ. बा. खापर्डे, श्री. मा. ना. घटाटे, श्री. ग. गो. बुटी वगैरे मंडळी डायरेक्टर बोर्डावर आहेत.

**महाराष्ट्र कारखानदार संघाची १९ वी वार्षिक सभा**—वरील सभा रविवार ता. २१ रोजीं भरली होती. सभेनें वार्षिक वृत्तांत व हिशेब मंजूर करून येत्या वर्षासाठी श्री. न. गं. आपटे ह्यांची अध्यक्षस्थानीं निवड केली. उपाध्यक्षांचे जागीं पायोनियर डाइंग हाऊसचे श्री. द. बा. फाटक, पार्कीट कारखानदार श्री. वा. के. सावळे व देवल भांड्यांचे कारखानदार श्री. वि. म. देवल ह्यांची निवड करण्यांत आली. श्री. आपटे हे संघाचे ओळीनें पांच वर्षे अध्यक्ष आहेत.

**खाद्यपदार्थ निर्मात्यांची संघटना**—महाराष्ट्रांतील खाद्यपदार्थांच्या कारखानदारांची प्रास्ताविक सभा ता. २१ रोजीं भरून संघस्थापना करण्याचें ठरलें. त्याकरितां श्री. आपटे, श्री. हेजीब, श्री. राजगुरु व श्री. फडके ह्यांची समिति नेमण्यांत आली. ह्या समितीनें श्री. आपटे ह्यांच्या सल्ल्यानें संघाची घटना वगैरे करावी असें ठरलें.

**युरोपियनांची वर्णी बंद करा**—हिंदी रेल्वेवर ह्यापुढें ग्रेट ब्रिटनमधील युरोपियनांची भरती करण्यांत येऊं नये, अशी रेल्वे स्टँडिंग फिनॅन्स कमिटीनें शिफारस केली आहे. विशिष्ट जागांसाठी थोड्या दिवसांकरितां तज्ज्ञांची नेमणूक करण्यास हरकत नाहीं.

**अमेरिकेंत मोटारींचें उत्पादन**—अमेरिकेंतील कारखान्यांमधील संपाची परिस्थिति बरीच सुधारली असल्याकारणानें तेथील मोटारींचें उत्पादन वाढत चाललें आहे.

**जपानमध्यें अमेरिकन कपाशीची आयात**—अमेरिका चालू वर्षी जपानकडे ८,९०,००० गाठी कपास पाठविणार आहे, त्याचें जपानी गिरण्यांत कापड बनविण्यांत येईल. जपानमध्यें उतरणाऱ्या कपाशीच्या वजनाच्या ६०% वजनाइतकें कापड जपान अमेरिकेला देईल व बाकीची कपास अंतर्गत उठावासाठी लागणाऱ्या कापडाकडे जपान खर्च करील.

**ग्रेट ब्रिटनचा निर्गत व्यापार**—ग्रेटब्रिटनचा निर्गत व्यापार १९४६ च्या पहिल्या तिमाहींत १९४५ च्या पहिल्या तिमाहीच्या मानानें ६३/४ कोटि पौंडांनीं वाढला. निर्गत मालाची किंमत वाढली, ह्याचा अर्थ वजनांत तो अधिक भरला, असा मात्र नव्हे, सर्वांत जास्त माल दक्षिण आफ्रिकेनें घेतला. हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया ह्यांचा अनुक्रम नंतर लागला. त्याखालीं फ्रान्स, इजिप्त, बेल्जम, अमेरिका, कॅनडा, हे देश आले. अर्जेंटिना व जर्मनी ह्यांचीं नांवें पहिल्या १२ देशांत १९३८ मध्यें होतीं, तीं मात्र अगदीं खालीं गेलीं आहेत.


तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात.

सांडू प्रेग युटेरो गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द.कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमीटेड (मुंबई)

पुणें चीफ एजंट्स:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालक:—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

डॉ. गोवंडे यांचे ज्वरबिंदू







फाऊंटन पेनकरितां
लोटस
शाई
सर्वत्र मिळते.

पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा

सारका निलगिरी

# अँग्लो-अमेरिकन कर्जविषयक करार

अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला द्यावयाच्या कर्जास यु. स्टे. काँग्रेसनें ता. १३ जुलै रोजीं अखेरची मान्यता दिली. हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजनें २१९ विरुद्ध १५५ मतांनीं तें कर्ज मंजूर केलें. सिनेटनें तें अगोदरच म्हणजे १० मे रोजीं मान्य केलें होतें. त्यामुळें, प्रेसिडेंट ट्रुमन ह्यांची ता. १५ जुलै रोजीं सही होतांच तें पक्कें झालें. ह्या कर्जाची रकम १४ अब्ज, ६६ कोटि रुपये ठरली असून १९५१ नंतर ५० हप्त्यांत त्याची परतफेड व्हावयाची आहे. व्याजाचा दर २% आहे. म्हणजे एकुण परतफेडीदाखल ग्रेट-ब्रिटनला अमेरिकेस १९ अब्ज, ८५ कोटि रुपये द्यावे लागतील. स्टर्लिंग गटांतील व्यापारी अडथळे दूर करून त्या गटांतील देशांना अमेरिकन माल विकत घेण्याची सोय करून देण्याचें इंग्लंडनें मान्य केलें आहे. अमेरिकेच्या दोन्ही विधिमंडळांत ह्या कर्जाचे तपशिलावर कडाक्याचे वादविवाद झाले होते. ( १ ) हें कर्ज देणगीच्या स्वरूपाचें आहे, ( २ ) पहिल्या महायुद्धांतील अमेरिकेचें कर्ज ग्रेट ब्रिटननें पूर्णतः फेडलेलें नाहीं, व ( ३ ) कर्जास तारण म्हणून पाश्चिम गोलार्धांतील कांहीं मान्यांचीं ब्रिटिश केंद्रें अमेरिकेनें घ्यावीत, हे प्रस्तुत वादविवादांतील प्रमुख मुद्दे होते.

कर्जाच्या कराराचा मसुदा ६ डिसेंबर, १९४५ रोजीं प्रेसिडेंट ट्रुमन व ब्रिटिश मुख्य प्रधान मि. ॲटली ह्या दोघांनीं जोडीनें जाहीर केला होता. उसनवार पद्धतीनें अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला माल पुरवून मोठें सहाय केलें होतें, त्याची रकम २ अब्ज, १६ कोटि रुपयांवर तोडण्यांत आली, परंतु ती गोष्ट प्रेसिडेंट ट्रुमन आपल्या अधिकारांत करूं शकले; त्याला विधिमंडळांची संमति आवश्यक नव्हती. कर्जाची व्यवस्था दोन देशांतील कराराच्या स्वरूपाची असल्याकारणानें त्याला काँग्रेसची मान्यता मिळविणें जरूर झालें. अँग्लो-अमेरिकन करारास कॉमन्स सभेची मान्यता मिळविण्याकरितां त्या सभेंत ब्रिटिश फडनवीस डॉ. डाल्टन ह्यांनीं गेल्या डिसेंबरांत ठराव मांडला, तेव्हां त्याची छाननी ब्रिटिश हितसंबंधांच्या दृष्टीनें झाली. अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांपैकीं अमेरिकेची बाजू प्रबळ असली तरी ब्रिटिश प्रतिनिधींनीं वाटाघाटींत आपल्या देशास अधिकांत अधिक सवलती मिळविल्या आहेत आणि त्या अपुऱ्या आहेत असें म्हणण्यास जागाच नाहीं, असा खुलासा डॉ. डाल्टन ह्यांनीं त्यावेळीं केला. ग्रेट ब्रिटनच्या इच्छेचे मानानें अमेरिकेनें फारच थोडें दिलें असलें तरी तें मान्य करणें शहाणपणाचें आहे, ह्या भूमिकेवरच कर्जाच्या करारास कॉमन्स सभेनें मान्यता दिली. जागतिक व्यापारवृद्धीचा विचार करण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय परिषद् येत्या वर्षीं भरविण्याची आहे, तिची पूर्व तयारी ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांनी सुरू केली आहे.

अँग्लो-अमेरिकन कर्जाच्या अटींवर आतांपर्यंत अनेकवार चर्चा झाली आहे, त्या अटींपैकीं ग्रेट ब्रिटनवर बंधनकारक झालेल्या मुख्य अटी खालीलप्रमाणें आहेतः— ( १ ) अमेरिकेकडून ज्या अटींवर कर्ज मिळालें त्यापेक्षां जास्त सवलतीच्या अटींवर ग्रेट ब्रिटननें १९५१ अखेर पर्यंत आपल्या साम्राज्यांतील देशांकडून कर्ज घ्यावयाचें नाहीं, (२) इंपीरिअल प्रेफरन्सचें म्हणजे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांनीं एकमेकांच्या मालास जादा सवलती व प्राधान्य देण्याचें धोरण ग्रेट ब्रिटननें सोडून द्यावें, ( ३ ) आपलें स्टर्लिंगमधील देणें भागविण्यासाठी त्यानें अमेरिकन कर्जाचा विनियोग करूं नये व ( ४ ) एका वर्षाच्या अवधींत ग्रेट ब्रिटननें " डॉलर पूल " मोडून टाकावा; त्यानंतर स्टर्लिंग गटांतील कोणत्याहि देशास आपल्या डॉलरमधील येण्याचा उपयोग स्वतःच्या इच्छेप्रमाणें करतां येईल.

अमेरिकेचें कर्ज मिळणार हें ब्रिटिश सरकार व जनता गृहीत धरूनच चालली होती आणि त्या कर्जाचे आधारावरच ग्रेटब्रिटननें आपला आर्थिक संसार आंखला होता. त्याकारणानें, कर्जमंजुरीचा ब्रिटिश जीवनावर तात्काळ परिणाम फारसा होण्याजोगा नाहीं. कर्जाची रकम हें भांडवल समजून चाललें पाहिजे; तें खर्चून टाकून भागणार नाहीं; कर्जाचा विनियोग, भांडवली माल, मशीन टूल्स इत्यादि उत्पादनास सहायकारक जिनसा खरेदण्याकडे केला पाहिजे, ह्या दृष्टीनेंच या कर्जाकडे ब्रिटिश सरकार पहात आहे, तथापि, अत्यंत जरूरीच्या जीवनोपयोगी जिनसा मिळविण्यासाठींहि ब्रिटिश सरकार त्या कर्जाचा थोडाफार उपयोग करील, असें प्रसिद्ध झालें आहे. पेट्रोल, छपाईचा कागद, अन्न इत्यादींचा त्यांत समावेश होतो. " कर्ज मिळालें म्हणून आपण आपलें उत्पादन व निर्गत व्यापार ह्यांत वाढ करण्याचे प्रयत्नांत कसूर करतां कामा नये. कर्जामुळें आपणांस सवड मिळत आहे तिचा उपयोग आपलें सामर्थ्य वाढविण्याकडे केला पाहिजे. " असें डॉ. डाल्टन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें आहे. अमेरिकेच्या मदतीबद्दल त्यांनीं आभारहि मानले आहेत.

ग्रेटब्रिटनमध्यें हिंदुस्थानासारख्या देशांचें मोठें येणें सांठून पडलें आहे, त्याचें पुढें काय होणार, हा आतां महत्त्वाचा प्रश्न उरला आहे. ह्या देशांशीं वाटाघाटी करून ग्रेटब्रिटन हें देणें कमी रकमेवर तोडण्याचा प्रयत्न करील, असें त्यानें अमेरिकेस आश्वासन दिलेलें आहे. अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनवर ह्या संबंधांत दडपण आणणें कसें अप्रस्तुत आहे, हें रिझर्व्ह बँकेचे आर्थिक सल्लागार श्री. जे. व्ही. जोशी ह्यांनीं आपल्या पुणें येथील ताज्या भाषणांत स्पष्ट केलें आहे. हिंदुस्थानाचें ग्रेटब्रिटनमधील येणें कमी करणें न्यायाचें होणार नाहीं, हेंहि त्यांनीं आकडेवार सिद्ध केलें आहे. स्टर्लिंगमधील येणें कमी रकमेवर तोडण्यासाठी ग्रेट ब्रिटन हिंदुस्थानाबरोबर वाटाघाटी सुरू करणार आहे, परंतु त्या वाटाघाटी हिंदुस्थानातर्फे लोकमतानुवर्ती सरकारच योग्य प्रकारें करूं शकेल हें उघड आहे. असें सरकार अद्याप अस्तित्वांत आलेलें नाहीं आणि सध्या सरकारनें ह्याबाबत बोलणीं केलीं तरी तीं हिंदुस्थानाच्या खऱ्या हितास पोषक होतील असा लोकांचा विश्वास कधींहि बसणार नाहीं. हिंदुस्थानाचें लंडनमध्यें साठलेलें येणें त्याच्या शीघ्र औद्योगीकरणास आज उपयोगी पडूं शकत नाहीं व " डॉलर पूल "मधील हिंदुस्थानाचा हिस्सा त्याच्या गरजा भागविण्यास उपलब्ध नाहीं. हे प्रश्न तात्काल सुटल्याविना हिंदुस्थानास लागणारी यंत्रसामुग्री त्यास मिळूं शकणार नाहीं. २ कोटि डॉलर्स खर्चून यंत्रसामुग्री मागविण्याची हिंदुस्थानास सवलत असतांही ग्रेट ब्रिटननें हे अमेरिकन डॉलर हिंदुस्थानास खर्चूं दिलेले नाहींत व स्वतःहि यंत्रसामुग्री पुरविली नाहीं, असा हिंदी कारखानदारांचा ब्रिटिश सरकारविरुद्ध आरोप आहे. हिंदुस्थानची गरज शक्य तितक्या लवकर कशी भागेल हाच आपल्या दृष्टीनें महत्त्वाचा प्रश्न आहे. अन्न, कच्चा माल, यंत्रसामुग्री, इत्यादि आयात करण्यास अँग्लो-अमेरिकन करारानें ग्रेट ब्रिटनला सहाय केलें आहे. कालांतरानें ब्रिटिश निर्गत व्यापार पुरेसा वाढून आपल्या उत्पन्नांतून ग्रेट ब्रिटन कर्ज फेड करूं शकेल अशी अपेक्षा कराराच्या मुळाशीं गृहीत आहे. अमेरिकेची समृद्धि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वृद्धीवर अवलंबून असल्याकारणानें, व्यापारी बंधनें दूर होणें त्याच्या हिताचें आहे. प्रस्तुत करारामुळें तें साध्य होईल, अशी अमेरिकेची खात्री आहे. जगाची पौंड-स्टर्लिंग गट व डॉलर गट अशी दोन वेगवेगळ्या भागांत विभागणी होऊं न देणें अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्या दोघांच्याहि अंतिम हिताचें आहे. ह्या सर्व व्यवहारांत रशिया मात्र कोठेंहि नाहीं, ह्याची जाणीव अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्या दोघांसहि आहे. रशियाच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीची आणि आक्रमक शक्तीची बाहेरील जगास आज कल्पनाहि नाहीं. सबंद जगाच्या हिताचा विचार करतेवेळीं रशिया बाहेर रहाणें केव्हांहि श्रेयस्कर नसलें तरी ती गोष्ट आज अपरिहार्य आहे. ह्या घटनेंतील भयबीजाकडे कानाडोळा करून भागणार नाहीं.

---

**स्पेनवर आर्थिक बहिष्कार**—अमेरिकेनें स्पेनमधील आपली खरेदी शक्य तेवढी कमी करण्याचें ठरविलें आहे. स्पेनमधील सरकार किंवा व्यापारी ह्यांचेशीं व्यापारीसंबंध ठेवण्यास अमेरिकन सरकारनें बंदी केलेली नाहीं, परंतु स्पेनशीं आर्थिक व्यवहार कमी करण्याचें त्याचें धोरण आहे. युद्धकाळांत जर्मनीला स्पेनमध्यें माल मिळूं नये, म्हणून अमेरिका मोठ्या प्रमाणावर ती खरेदी करीत आहे.

**इंपीरिअल बँक-सहामाही नफा**—इंपीरिअल बँकेस १९४६ च्या पहिल्या सहामाहींत ५४,९७,२०० रुपये नफा झाला. १४% इंटेरिम डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें आहे.

# स्फुट विचार

## हिंदी उद्योगधंदे आणि संरक्षक जकाती

हिंदुस्थानांत युद्धकालीं निघालेल्या नवीन उद्योगधंद्यांच्या चालकांनी परकीय स्पर्धेपासून रक्षण होण्यासाठी हिंदुस्थान सरकारकडे संरक्षण जकातीची मागणी केली व त्या मागणीची चौकशी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक हंगामी टॅरिफ बोर्डही नेमलेलें आहे. या बोर्डावर आणखी दोन किंवा तीन सभासदांची नेमणूक होणार आहे असें समजतें. संरक्षक जकातीच्या मागणीबाबत चौकशी करण्यासाठी एकंदर ३० उद्योगधंद्यांचीं नांवें बोर्डाकडे नमूद करण्यांत आलीं असून त्यांपैकीं सुमारें १२ धंद्यांबाबतचे अहवाल बोर्डानें सरकारकडे पाठविले आहेत. ही चौकशी लवकर होऊन, लोखंड, पोलाद, कापडाच्या गिरण्या, साखर, कागद व रेशीम वगैरे धंद्यांना संरक्षक जकातीची कितपत आवश्यकता आहे हें स्पष्ट झालें पाहिजे. यापूर्वी काच कारखाने व लोकरीचे कारखाने यांतर्फेही संरक्षक जकातीची मागणी करण्यांत आली होती. परंतु सरकारनें ती नामंजूर केली होती. आतां या धंद्याचे चालक पुन्हा अर्ज करून संरक्षण मिळविण्याचा प्रयत्न करणार आहेत असें समजतें. सध्या युरोपिअन मालकीच्या कारखान्यांतून हिंदी भांडवलदार भागीदार होत आहेत; त्याचप्रमाणें कांहीं हिंदी कारखानदार इंग्लंडमधील नफील्ड इंपिरिअल केमिकल सारख्या कंपन्यांशीं करारमदार करीत आहेत. हिंदी–भांडवल व परकीय भांडवल यांची अशी जुळणी होत असतांना टॅरिफ बोर्डाच्या अहवालांना साहाजिकच एरवींपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे. कारण ही भांडवलाची गुंतागुंत झाल्यावर हिंदी उद्योगधंद्यांना मिळणाऱ्या संरक्षक जकातीचा फायदा अंशतः तरी युरोपिअन भांडवलदारांना मिळाल्यासेरीज रहाणार नाहीं. या दृष्टीनें पहातां हिंदुस्थान सरकारचे माजी अर्थ–सल्लागार सर थिओडार ग्रेगरी यांनीं लंडन येथें नुकत्याच केलेल्या भाषणाकडे लक्ष देणें जरूर आहे. लंडनमधील एंजिनिअरिंग–इंडस्ट्रीज असोसिएशनपुढें 'जागतिक व्यापार' या विषयावर बोलतांना मि. ग्रेगरी म्हणाले कीं "पूर्वेकडील देशांतील उद्योगधंद्यांच्या वाढीची भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण पूर्वेकडील देशांना केवळ अवजड यंत्रसामुग्रीची गरज आहे असें नाहीं; अन्नाचीही तितकीच गरज आहे. शिवाय दुसरें असें कीं, पूर्वेकडील देशांतील रहाणीचें मान इतकें निकृष्ट आहे कीं, औद्योगिक प्रगतीमुळें उत्पन्न होणाऱ्या मालाला तेथेंच भरपूर गिऱ्हाइक सांपडेल." मि. ग्रेगरी यांच्या भाषणावरून हिंदी बाजारपेठेची इंग्लंडला अजूनही किती आवश्यकता आहे हें सिद्ध होत नाहीं काय ?

---

## हिंदुस्थानांत व्यावहारिक गणिताचें केंद्र

महायुद्धानंतर फ्रिस्को परिषदेंत जागतिक शांतता राखण्यासाठी संयुक्त राष्ट्र–संघटना निर्माण करण्यांत आल्याचें प्रसिद्धच आहे. परिषदेंत मंजूर झालेल्या घटनेप्रमाणें निरनिराळ्या कार्यांसाठी स्वतंत्र संघटना निर्माण करण्यांत आलेल्या आहेत. संयुक्त राष्ट्रसंघटनेंतील बड्या राष्ट्रांत जे वाद अनेक राजकीय प्रश्नांवर माजले आहेत, त्यामुळें या संघटनेच्या छत्राखालील इतर किरकोळ पण महत्त्वाच्या समित्यांच्या कार्यांकडे फारसें लक्ष दिलें जात नाहीं. या साह्यकारी समित्यांत शास्त्रीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक बाबींकडे लक्ष देणारी एक समिती असून तिचे कार्यकारी चिटणीस प्रो. ज्यूलिअन हक्स्ले हे आहेत. इंग्लंडमधील एक प्रख्यात शास्त्रज्ञ म्हणून प्रो. हक्स्ले हे प्रसिद्ध आहेत. लंडन येथें ब्रिटिश साम्राज्यांतील शास्त्रज्ञांची एक परिषद नुकतीच भरविण्यांत आली होती. परिषदेंत भाषण करतांना मि. हक्स्ले यांनीं अशी माहिती सांगितली कीं, हिंदुस्थानांत व्यावहारिक गणित–शास्त्राचें मोठें केंद्र लौकरच उघडण्यांत येणार आहे. या केंद्रांत बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार करूं शकणारीं अगदीं अद्यावत् हिशेबाचीं यंत्रें बसविण्यांत येणार असून यामुळें आंकडेमोडींत होणाऱ्या वेळाच्या अपव्ययाची खूपच बचत होणार आहे. ज्या आंकडेमोडीला मोठमोठ्या तज्ज्ञांना सुद्धा कित्येक दिवस अगर कित्येक आठवडे लागतील अशा प्रचंड आकडेमोडीच्या घडामोडी हीं यंत्रें कांहीं सेकंदांत करूं शकतील. गणिताच्या केंद्रासाठी हिंदुस्थानच निश्चित करण्याचें कारण असें सांगण्यांत येत आहे कीं, हिंदी शास्त्रज्ञांत कांहीं जगप्रसिद्ध गणिती आहेत, म्हणून हिंदुस्थानची निवड करण्यांत आली आहे, तथापि हें कारण अगदींच वरकरणी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या पुढील काळांत हिंदुस्थानांत ब्रिटिश व अमेरिकन भांडवलाच्या मदतीनें मोठी औद्योगिक प्रगति होईल असें दिसत आहे. इंग्लंड–अमेरिकेंतील औद्योगिक प्रगति पूर्व–नियुक्त योजनेप्रमाणें झालेली नाहीं. अशा स्वैर प्रगतीला वाव देणें आतां अशक्य असल्यामुळेंच वरील संस्था निर्माण करण्यांत येत असावी. यांतील राजकारणाचा भाग सोडून देऊन इतकेंच म्हणावें लागेल कीं हिंदी औद्योगिक अभिवृद्धीच्या मार्गांतील व्यावहारिक अडचणी व प्रश्न यांची माहिती वरील संस्थेनें करून घेतली पाहिजे. नाहींतर व्यावहारिक–गणित–केंद्राचें रूपांतर गणित शास्त्रज्ञांच्या वसाहतींत झाल्यासेरीज रहाणार नाहीं.

---

## सर्व बँकांचे एकाच नमुन्याचे व आकाराचे चेक

वेगवेगळ्या बँका निरनिराळ्या आकाराचे व नमुन्याचे चेक छापून घेतात, परंतु सर्वांनीं एकजात सारखे चेक छापून घेतले तर फायलिंग व हिशेब ह्यांची चांगली सोय होण्याजोगी आहे. ग्रेटब्रिटनमधील क्लिअरिंग बँकांनीं ह्याबाबत पुढाकार घेतला आहे. चेक, डिव्हिडंड वॉरंट व कर कापून घेतल्याचें सर्टिफिकेट ह्यांचा आकार व नमुना सर्वांनीं एकजात करण्याचें ठरविलें आहे. खासगी वापराचे चेक ६ इंच लांब व ३ इंच रुंद ठेवण्यांत येतील. परंतु व्यापारी पेढ्यांचे चेक ८ इंच लांब व ४ इंच रुंद ठेवले जातील. ह्या लांबी–रुंदींत कौंटर फॉइलचा समावेश नाहीं. चेकवर रकमेचा आकडा लिहिण्यासाठी उजवीकडे, खातेदाराच्या सहीचे वरतीं, जागा ठेवण्यांत येईल. बँकांनीं छापून घेतलेले पहिले चेक संपेपर्यंत सर्वांचे चेक एकसारखे होणार नाहींत, हें उघड आहे.

---

## विक्रीकराची दुबार आकारणी होणार नाहीं

विक्रीवरील कर दुकानदारानें केव्हां द्यावयाचा, ह्याविषयीं खुलासा सेल्स टॅक्स कमिशनरनें प्रसिद्ध केला आहे. ज्यांची विक्री दरसाल १० हजार रुपयांपेक्षां अधिक आहे असे सर्व व्यापारी व कारखानदार विक्री करास पात्र आहेत व त्यांनीं आपलें नांव रजिस्टर केलें पाहिजे. रजिस्टर्ड डीलरला विकलेला कच्चा माल किंवा पुनः किरकोळीनें विकण्यासाठी विकलेला माल हा एकुण विक्रींतून वजा करून करास पात्र असलेली विक्री निश्चित केली जाईल, म्हणजे, रजिस्टर्ड कारखानदार वापरीत असलेला कच्चा माल किंवा एकाच मालाची अनेक रजिस्टर्ड डीलर्सना झालेली विक्री ह्यांवर कर नाहीं. माल जेव्हां अखेर गिऱ्हाकास किंवा न नोंदलेल्या व्यापाऱ्याचे हातीं पडेल, तेव्हांच त्यावर विक्री कर बसेल म्हणजे, विक्रीवर हा फक्त एकाच व्यवहारावर लादण्यांत येईल. १० हजारांवरील व्यवहारवाल्यांनीं आपलें नांव रजिस्टर केलेलें मात्र असलें पाहिजे.

---

## यंत्रसामुग्रीचा तुटवडा

हिंदी कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन, कापडाची आयात, निर्गत, इत्यादींचे आकडे पहातां वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी जास्त व अधिक चांगलें कापड दिवसानुदिवस लागणार हें उघड आहे. युद्धकाळांत कापडाचा तुटवडा पडला, त्याला अनेक कारणें घडलीं. तथापि, नवी यंत्रसामुग्री व सुटे भाग ह्यांची आयात बंद पडल्यामुळेंच कापडाचें उत्पादन जरूरीप्रमाणें वाढूं शकलें नाहीं, यंत्रसामुग्री हिंदुस्थानांत बनविण्याचे प्रयत्न करण्यांत आले ते अर्थातच मोठ्या प्रमाणावर झालेले नाहींत. ब्रिटिश, अमेरिकन किंवा स्विस यंत्रसामुग्री उपलब्ध नाहीं व तिची किंमतहि अद्याप भरमसाट आहे. दरमाणशीं १० वार कापड, हें प्रमाण किमान ३० वारांपर्यंत नेण्याची आवश्यकता नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें गृहीत धरली आहे. हिंदी लोकांच्या राहणींत एवढी वाढ झाल्यास गिरण्यांचें कापड उत्पादन तिपटीनें वाढणें आवश्यक होईल. हिंदुस्थानांतच यंत्रसामुग्रीचें उत्पादन सुरू करणें हितावह ठरेल आणि त्यासाठी सरकारनेंच पुढाकार घ्यावा लागेल.

## बँकेचा डिमांड ड्राफ्ट म्हणजे चेक नव्हे.

### मुंबई हायकोर्टाचा ताजा निवाडा

विजयानगरम् येथील एका व्यापाऱ्यानें तेथील इंपीरियल बँकेच्या शाखेकडून मुंबईवर "शांतीलाल शहा ऑर ऑर्डर" ह्या नांवाचा ४,४०० रुपयांचा एक ड्राफ्ट १० मार्च १९४४ रोजीं विकत घेतला. त्यानें तो ड्राफ्ट पोस्टानें शांतीलालकडे मुंबईला धाडला, परंतु तो त्यास कधींच पोंचला नाहीं. १४ मार्च, १९४४ रोजीं नागिनदास प्रेमजी शहा नांवाच्या एका इसमानें तो ड्राफ्ट एक्सचेंज बँक ऑफ इंडियाकडे भरला. नगिनदासचें ह्या बँकेंत चालू खातें होतें. बँकेनें इंपीरिअल बँकेकडून ड्राफ्टचे पैसे आणवून ते नगिनदासाच्या खातीं जमा केले. त्यानें १६ मार्च १९४४ रोजीं ते पैसे खात्यांतून काढले. विजयानगरमच्या व्यापाऱ्यानें एक्सचेंज बँकेविरुद्ध मुंबई हायकोर्टांत दावा लावून बँकेकडून नुकसानभरपाई मागितली.

प्रतिवादी बँकेनें निगोशिअबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टाच्या १३१ वे कलमाचा आश्रय घेतला. बँकेनें आपल्या गिऱ्हाइकाच्या वतीनें चेकची रकम निष्काळजीपणा न दाखवितां व सद्हेतूनें वसूल केली, तर चेकमध्यें दोष जरी आढळला तरी बँक नुकसानभरपाई करण्यास बांधलेली नाहीं असें तें कलम सांगतें. १३१ व्या कलमानें बँकेस दिलेली ही सवलत चेकला लागू आहे; डिमांड ड्राफ्टला नाहीं असा हायकोर्टानें अभिप्राय व्यक्त केला. ड्राफ्टचे पैसे गिऱ्हाइकासाठीं वसूल करण्यांत निष्काळजीपणा घडला नाहीं, हें बँकेनें सिद्ध केलें नाहीं, असेंहि हायकोर्टाचें मत पडलें व बँकेनें वादीस ४४०० रुपये द्यावे असा त्यानें निवाडा केला. न्या. कोयाजी ह्यांचेपुढें हा दावा चालला.

## आयात व्यापारावरील सरकारी बंधनें

### इंग्लंडमधून माल मागविण्याचा आग्रह

"हिंदुस्थान सरकाराच्या आयात व्यापाराच्या निर्बंधांचें धोरण एकाच गोष्टीनें निश्चित झालेलें दिसतें. ती म्हणजे, भांडवली मालाच्या सर्व ऑर्डरी इंग्लंडकडे कशा जातील, ह्याची चिंता होय. हिंदी औद्योगिक प्रगतीस त्यामुळें अडथळा येत आहे, इकडे सरकार बघतच नाहीं. युद्धोत्तर औद्योगिक वाढीसाठीं बिगर स्टर्लिंग देशांकडून (म्हणजे मुख्यतः अमेरिकेकडून) भांडवली माल घेण्यासाठीं २ कोटि डॉलर्स राखून ठेवले आहेत. त्यांचा हिंदुस्थानानें फारच थोडा फायदा घेतला आहे असें हिंदुस्थान सरकारचे फडणवीस ह्यांनींच स्वतः अंदाजपत्रकावरील आपल्या भाषणांत कबूल केलें आहे. बिगर–स्टर्लिंग देशांत ४०% स्वस्त अधिक, चांगला व चालू यंत्रसामुग्रीशीं जुळता असा भांडवली माल मिळत असतांहि इंग्लंडमध्येंच चौकशी करण्याचा आग्रह करण्यांत येतो. कित्येक प्रसंगीं, बिगरस्टर्लिंग देशांतून माल आणण्याची घाई करण्याचें कारण नाहीं, इंग्लंडमध्येंच तो लवकरच उपलब्ध होईल असें सांगण्यांत येतें. हिंदुस्थान सरकारनें हिंदी मागणी पुरवणाऱ्या कोणत्याहि देशांतून यंत्रसामुग्री व इतर भांडवली माल मागवण्यासाठीं लायसेन्स द्यावींत, म्हणजे परिस्थितींत सुधारणा होईल." —फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्सची हिंदुस्थान सरकारच्या धोरणावर टीका.

**टारिफ बोर्डापुढें साक्ष देणारा गैरमाहितगार साक्षीदार**— लोणी व सोड्याचीं पेयें ह्यांत वापरण्यांत येत असलेल्या रंगाचे धंद्याला संरक्षणाची मागणी आहे, तिचा प्रश्न टारिफ बोर्डापुढें असतांना अमृतसरचे रंगाचे कारखानदार मेसर्स किशनचंद प्यानचंद ह्यांचे तर्फे श्री. इ. जी. टिपणीस हे टारिफ बोर्डापुढें साक्षीदार म्हणून आले. त्यांचा संरक्षण मागणाऱ्या फर्मशीं कांहींच संबंध नव्हता, आणि त्यांना उत्पादनखर्च, स्पर्धेचें स्वरूप, इत्यादींविषयीं तपशीलवार माहिती सांगतां येईना. तेव्हां टारिफ बोर्डाच्या अध्यक्षांनीं चौकशी थांबविली आणि "तुमच्या फर्मच्या प्रवृत्तीमुळें सार्वजनिक पैशाचा अपव्यय होत आहे, हें तिला कळवा" असें फर्मच्या प्रतिनिधीस सांगितलें.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर (जि. नाशिक)

**एकूण खेळतें भांडवल रु. ४० लाखांचेवर**

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. (अध्यक्ष) | श्री. बी. वी. साळवेकर, M. L. A. (उपाध्यक्ष) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. (Ele. & Mech.) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. (Hons.) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. Sc. | श्री. के. पी. जोशी |

(गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे.)

* मुंबई, नगर, नासिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार






## कापड महाग करण्याचें समर्थन

कापडाच्या कमाल किंमतींत १ ऑगस्ट पासून वाढ होणार आहे, त्यामुळें जाडेंभरडें गरीबांस लागणारें कापड महाग झालें तरी तलम कापड मात्र स्वस्त होत आहे. टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाची इंडस्ट्रीज कमिटी व हिंदुस्थानसरकार ह्यांचेविरुद्ध ह्या वाढीबद्दल कडक टीका ऐकूं येते. कापड स्वस्त होण्याची लोकांची अपेक्षा व आशा असतांना तें महाग होणें त्यास पटणें शक्य नाहीं. किंमतीमधील वाढीचीं कारणें देतांना कच्च्या मालाच्या किंमतीची चढती कमान नीट समजावून सांगण्यांत आलेली नाहीं. खालील तक्त्यांत कापडाची कमाल किंमत आणि कपाशीची किंमत ह्यांचे तुलनात्मक आकडे दिले आहेतः—

### कापडाची किंमत : प्रत्येक पौंड वजनास

| नंबर | मार्च १९४४ | सप्टेंबर १९४४ | नोव्हेंबर १९४५ | ऑगस्ट १९४६ |
|---|---|---|---|---|
| १४S/१४ | २६.०० | २२.०० | १९.९० | २०.७० |
| २०S/२० | ३२.१० | २७.३० | २४.५० | २६.०० |
| ४०S/४० | ६१.१० | ५१.९० | ४६.९० | ४४.७० |
| ( आफ्रिकन कपास ) | | | | |
| ६०S/८० | ९४.२५ | ८०.०० | ७८.७५ | ७४.१० |

### कपाशीची किंमत : प्रत्येक खंडीस

| नंबर | मार्च १९४४ | सप्टेंबर १९४४ | नोव्हेंबर १९४५ | ऑगस्ट १९४६ |
|---|---|---|---|---|
| १४S/१४ | ४७० | ४०० | ४०५ | ५६० |
| २०S/२० | ५७५ | ४६० | ४१५ | ५९० |
| ४०S/४० | ९७० | ९७० | ८५० | ८५० |
| ६०S/८० | ११५० | १२४० | १२३० | १०७५ |

कपाशीची किंमत चढत चालली असली तरी कपडाची किंमत उतरत गेल्याचें वरील तक्त्यावरून दिसून येईल आणि कपाशीची किंमत आणखी वाढण्याचा रंग दिसतो. स्टोर्स व रसायनें ह्यांची किंमत अद्याप उतरलेली नाहीं आणि रहाणीच्या खर्चाच्या मानाबरोबर महागाईभत्ता वाढतच चालला आहे. कामाचे तास कमी करण्यांत आल्यामुळें उत्पादन कमी होऊन उत्पादनखर्च वाढणार आहे. कापडाच्या किंमती वाढवून दिल्या आहेत, त्याचें समर्थन गिरणीवाल्यांतर्फे वरील प्रकारें करण्यांत येत आहे.

---

## व्यापारी व कारखानदार ह्यांस उपयुक्त मासिकें


### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें,

संस्थेच्या वाचनालयाकडे खालील नियतकालिकें पुन्हां येऊं लागलीं आहेत. तरी व्यापारी व कारखानदारांनीं त्याचा अवश्य फायदा घ्यावा.

( १ ) फॉरेन कॉमर्स वीकली ( अमेरिका ).
( २ ) हेल्थ, मद्रास.
( ३ ) युनायटेड एम्पायर, लंडन.
( ४ ) दि प्लँटर्स जर्नल ॲण्ड ॲग्रिकल्चरिस्ट, कलकत्ता.
( ५ ) फार्म इम्प्लिमेंट्स ॲण्ड मशिनरी रिव्ह्यू, एसेक्स.
( ६ ) दि ऑस्ट्रेलियन शुगर जर्नल, ब्रिस्बेन.
( ७ ) ईस्ट इंडियन रेल्वे मॅगेझिन, कल.
( ८ ) दि इंडियन रेल्वे गॅझेट, कलकत्ता.
( ९ ) इंडियन ॲव्हिएशन, कलकत्ता.
(१०) क्वीन्सलंड गव्हर्नमेंट मायनिंग जर्नल, ब्रिस्बेन.
(११) दि न्यू यॉर्क लम्बर ट्रेड जर्नल, ( अमेरिका ).
(१२) दि इंडियन इलेक्ट्रिकल ॲण्ड मेकॅनिकल एंजिनिअर्स जर्नल, ब्रिस्बेन.

---

बिनचूकच्या माहितीनें
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पुना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
:इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत :

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
पैसा व ज्ञान मिळवा !
श्रीमंत कसें व्हावें—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा ! किं. १॥ रु.
१०० टक्के यश—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.
काम आणि कामिनी—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें ! अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.
मृत्युलोकचा प्रवास—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

वर्गपुस्तकें बंद

इंदूर माळवा दि. २-८-४६ ते २७-८-४६

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १६।७।४६ | बुधवार १७।७।४६ | गुरुवार १८।७।४६ | शुक्रवार १९।७।४६ | सोमवार २२।७।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड्स | ३० | ३३१७—८ | ३३२२—८ | ३३१८-१२ | ३३५५—० | |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५९० | ५९२—८ | ५९१—८ | ६०२—९ | |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २७७३-१२ | २७८०—० | २८०५—० | २८७०—० | |
| ७०२; ५६६ | १९——०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | १००२—० | १०३६—० | १०५८—० | १०७५—० | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८६३—० | ८८५—८ | ९०६—० | ९२१—० | |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ५११—० | ५१९—० | ५१९—० | ५३८—० | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४५९—० | ४५९—० | ४८१—० | ५२४—९ | |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ४१४—० | ४१९—० | ४२१—० | ४४६—० | |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४६१—० | ४६९—० | ४८०—० | ५०२—० | |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ६-११-६ | ६-१० | ६-११-६ | ७—० | |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २६—९ | २६-१५ | २७-५-६ | २७-१४ | |
| ३-१०; २.९ | ०-३-० | मे | ,, डिफर्ड्स | १ | ६—३—६ | ६—८ | ६—७ | ६—८ | |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ९८७—८ | ९९६—४ | १ॅ-११-४ | १०३७—८ | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ११० | २६५—० | २६५—० | २६८—० | २७०—८ | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३४८—८ | ३४७—० | ३४९—० | ३५०—० | |
| ५९२-८; ५१०-० | ७-- | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ७९०—० | ७९०—० | ७९०—० | ८०७—८ | |
| ४३-७; ३०-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ५७—४ | ५७—८ | ५९—० | ५९-१४ | |

**मुंबई प्रांताचें पुरवणी अंदाजपत्रक**—मुंबई प्रांताच्या फडणवीसांनीं सुमारें ६ कोटि रुपये जादा खर्चास असेंब्लीची संमति मागितली आहे. खर्चाच्या मुख्य बाबी खालीलप्रमाणें आहेत:—

| | रु. |
|---|---|
| दुष्काळ निवारण | १,५४,००,००० |
| पोलीस | ९४,८१,००० |
| शिक्षण | ७८,५४,४०२ |
| शेतकी | ४९,६२,७०० |
| आरोग्य | २५,००,००० |

**पेट्रोलवरील नियंत्रणें वाढणार**—मोटार गाड्यांच्या पेट्रोलचें रेशन १ ऑगस्ट पासून वाढविण्याचें सरकारनें ठरविलें होतें, परंतु तेलाच्या कंपन्यांतील कामगारांच्या संपामुळें पेट्रोलचा पुरवठा बंद पडल्या कारणानें रेशन वाढविणें सरकारास अशक्य झालें आहे. संप आणखी कांहीं काळ टिकल्यास पेट्रोलच्या वापरावरील नियंत्रणें उलट वाढवावीं लागतील.

**शांतता परिषदेस हिंदी प्रतिनिधी**—जुलैच्या २९ तारखेस पॅरिस येथें शांतता परिषदेस प्रारंभ होईल. सर सॅम्युएल रंगनाथन व सर जोफेस भोर हे हिंदुस्थानातर्फे परिषदेस तूर्त उपस्थित होतील.

**उतारूजवळील साखर**—कोणीहि उतारूनें आपल्याबरोबर २० शेरांपेक्षां ज्यास्त साखर नेऊं नये, असा कायदा होता तो बदलून आतां ती मर्यादा ५ शेरांवर आणण्यांत आली आहे.

**प्रॉपर्टी टॅक्स आला, म्हणून भाडें वाढवितां येणार नाहीं:**—"हल्लींचा भाडेनियंत्रणाचा जो कायदा पुणें शहरास लागू आहे त्यांतील सातव्या कलमानें घरमालकाला भाड्यांत वाढ करणेस जी सवलत ठेविली आहे ती फक्त म्युनिसिपालिटीनें टॅक्समध्यें वाढ झाल्यासच करतां येते. हल्लींचा हा प्रॉपर्टी टॅक्स मुंबई प्रांतिक सरकारचा असल्यामुळें भाड्यांत वाढ होऊं शकत नाहीं." असा खुलासा पुणें घरभाडेकरू संघानें प्रसिद्ध केला आहे.


कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

कॅपिटल कंट्रोल ऑर्डर ९४/अ अन्वयें दिलेल्या सवलतीनुसार

दोन लक्षांचे ६ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विक्रीस काढले आहेत.

कृष्णा कित्तूर, जि. बेळगांव

विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस.



**कपाशीचे साठे दरसाल कळवा**—कॉटन जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरीज व कपाशीचे व्यापारी ह्यांनीं त्यांचे जवळ दरसाल ३१ ऑगस्ट रोजीं असलेला साठा कळविला पाहिजे, असा कायदा मुंबई सरकार करणार आहे. मुंबई प्रांतांतील हिंदी कपाशीच्या साठ्याची आकडेवार माहिती गोळा करण्यास त्यामुळें सहाय्य होणार आहे.

**बँक नोकरांची मागणी व संपाची नोटीस**—बँक नोकरांच्या २८ यूनियन्सच्या कार्यकारी मंडळांनीं शनिवार ता. २० रोजीं आपल्या हक्कांची यादी मंजूर केली. ही यादी बँकांपुढें १ ऑगस्टचे सुमारास मांडण्यांत येईल. ती बँकांनीं मान्य न केल्यास १५ ऑगस्ट रोजीं संपाची नोटीस देऊन १ सप्टेंबर रोजीं संप सुरू करण्याचा त्यांचा विचार आहे. वरील २८ यूनियन्स १०,००० नोकरांचे वतीनें मागणी करीत आहेत.

**पोस्टल संप आणि विमेदार**—पोस्टल संपामुळें कित्येक कंपन्यांनीं आपलीं डिव्हिडंड वॉरंटस धाडण्याचें पुढें ढकललें आहे. कांहीं विमा कंपन्यांनीं जाहिराती देऊन आपल्या विमेदारांस हप्ते पाठविण्याची शक्य तों सटपट करण्याबद्दल सूचना केली आहे. हप्ते हे विमा कंपनीच्या मुख्य कचेरींत जमा झाले नाहींत, आणि मधल्या काळांत विमेदारास मृत्यु आला, तर कंपनी त्यास जबाबदार नाहीं, अशी कायदेशीर परिस्थिति आहे. दूरदूरचे विमेदार आपले हप्ते मनिऑर्डरीनें पाठवितात, त्यांची ह्यामुळें कुचंबणा होणार आहे. प्रस्तुत अड-चण लक्षांत घेऊन, विमा कंपन्यांनीं आपल्या विमेदारांस योग्य तें आश्वासन देणें उचित होईल. कित्येक विमेदारांनीं ह्यासंबंधांत "अर्था" कडे विचारणा केली आहे. पोस्टल संपामुळें उशीरा हप्ते पोचल्यास कंपनी त्याचा न्यायानें विचार करील; विमेदारांवर विनाकारण भुर्दंड बसणार नाहीं, अशी व्यवस्था कंपन्यांनीं अवश्य केली पाहिजे. कॉमनवेल्थ कंपनीनें ह्या बाबत पुढाकार घेतला आहे, हें अभिनंदनीय आहे.

**विक्रीकराची वर्तमानपत्रांस माफी द्या**—वर्तमानपत्रांच्या विक्रीवर पंजाब व बंगालमधील विक्रीकरानें कर बसविलेला नाहीं. मुंबई सरकारनें त्याचें अनुकरण करावें, अशी इं. लँग्वेजेस न्यूजपेपर्स असोसिएशननें विनंति केली आहे.

**हिंदुस्थान स्पन पाइप्स लि.**—स्पन कॅांक्रीट पाइप्स व इतर प्री-कास्ट कॅांक्रीट जिनसा तयार करण्यासाठी वरील कंपनी श्री. रामभाऊ अभ्यंकर ह्यांनीं नोंदवली आहे.

**हिं. सरकारचें नवें कर्ज**—हिंदुस्थान सरकारनें २½% व्याजाचे ३५ कोटि रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. १ ऑगस्ट रोजीं कर्जासाठी अर्ज घेण्यास प्रारंभ होईल व त्याच दिवशीं संध्याकाळीं अर्ज घेणें बंद होईल. कर्जाची परतफेडीची तारीख १ ऑगस्ट १९६१ ही आहे. १०० रुपयांचाच रोखा १०० रुपयांस मिळेल.

---

### वाहतुकीची अडचण व कृत्रिम तुटवडा

वाहतुकीच्या सवलतीच्या अभावीं, कारखान्याला लागणारा कच्चा माल योग्य त्या प्रमाणांत न मिळतां उलट तयार माल तसाच पडून राहून मालाचा कृत्रिम तुटवडा फक्त निर्माण होतो. डेक्कन पेपर मिलकडे केवळ बुकिंगच्या अडचणींमुळें, लोकांकरितां काढून ठेवलेला ३०० टन कागद तसाच पडून आहे. शिवाय १९४५-४६ सालीं बाहेरगांवीं जिल्हानिहाय पाठविण्यास परवानगी मिळालेल्या २०८५ टन कागदापैकीं ८८२ टन कागद वरील कारणामुळें मिलला पाठवतां आला नाहीं. तसेंच तळेगांव कांच कारखान्याला बाहेरून कच्चा माल आणावा लागतो व पक्का माल बाहेर पाठवावयाचा असतो. पण बुकिंगच्या अडचणींमुळें कच्च्या मालाचा पुरवठा तर होत नाहींच तर उलट पक्का मालहि कारखान्यांत पडून आहे. अशा कारणामुळें निष्कारण मालाचा तुटवडा निर्माण होऊन व्यापारी संबंधही तुटतात, व परिणामीं कारखान्याचा नित्याचा खर्च चालणेंही मुष्किल होऊन बसलें आहे. तेव्हां विशेषतः युद्ध संपलेलें असल्यामुळें रेल्वे नियंत्रणाधिकाऱ्यांनीं योग्य ती दक्षता घेऊन तळेगांव व हडपसर येथील स्टेशन अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात अशी मराठा चेम्बरची आग्रहाची विनंति आहे.


# दि विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड

—येरंडवणा, पुणें ४—

**अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल**
**रु. १,००,०००**


**भरणा झालेलें भांडवल**
**रु. ३४,५००**

सदर भांडवल २५ रुपयांच्या २००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें आणि ५० रुपयांच्या ६ टक्के दराच्या १००० प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागण्यांत आलें आहे.

—मॅनेजिंग एजंटस—
**महा—कवडीकर आणि कंपनी**

सदर कारखान्यांत नित्योपयोगी सुती कापड तयार होतें





**अधिक धान्य पिकविण्याची योजना**

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेटस

**हें अमोघ साधन आहे.**

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.